# नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४० सन २०१६ मधील निशाणी २६ खालील

# आदेश

इरशाद अहमद मोहीद्दीन शेख
वि.
अहमद इब्राहीम खान व.

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे फेर कोर्ट कमीशनर म्हणुन जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख ओरोस यांची नेमणुक होऊन दावा मिळकत तसेच सर्व्हे नंबर ७३ हि.नं. १६ ची मिळकतची हद्दीसह मोजणी होऊन प्रतिवादीने केलेले संडास व गडग्याचे बांधकाम दाखविण्याचा आदेश होणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीने असे कथन केले की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी याने सर्व्हे नं. ७३ हि.नं. १५ या मिळकतीत अनाधिकारे कब्जा करुन संडासचा काही भाग व गडग्याचे अर्धवट बांधकाम अनाधिकारे अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. सबब, प्रतिवादीने दावा मिळकतीत केलेले बांधकाम काढून दावा मिळकतीचा अनाधिकारे बळकावलेला कब्जा वादीस परत मिळणेकरीता व वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जाभोग्यास प्रतिवादीने हरकत करु नये अशी कायम ताकिदी करीता दावा दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी याने संडासचे व गडग्याचे काही भाग वादीच्या मिळकतीत येत आहे. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले नाही. दावा मिळकतीमध्ये बांधकाम केले आहे की दावा मिळकतीच्या बाहेर आहे यातील संदीग्धता दुरु होऊन वादीने दावा मिळकत तसेच सर्व्हे नं. ७६ हि.नं. १६ ची मिळकत या दोन्ही मिळकतीची हद्दी ठराव मोजणी करुन खरी वस्तुस्थिती कोर्टासमोर येणे करीता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कुडाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करुन तसा अहवाल याकामी हजर केला आहे. सदर अहवाल वादीस मान्य व कबुल नाही. तरी फेर कोर्ट कमीशन जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख ओरोस यांच्यामार्फत करण्यात यावे व दावा मिळकत तसेच सर्व्हे नंबर ७३ हि.नं. १६ ची मिळकतीची हद्दीसह मोजणी होऊन प्रतिवादीने केलेले संडास व गडग्याचे बांधकाम

दाखविण्याचा आदेश करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

०३. प्रतिवादीने नि. २८ येथे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुत दाव्याचे कामी नि. २२ ने कोर्ट कमिशन अहवाल न्यायालयात दाखल केला आहे. यापुर्वी दाखल केलेल्या कोर्ट कमीशन नेमणुकीसंदर्भात अर्जामध्ये व प्रस्तुतच्या अर्जामध्ये एकाच कारणास्तव सदर दाव्याचे कामी वादीकडून दुस–यांदा कोर्ट कमिशनची मागणी करणेत आलेली आहे. पुर्वीचे न्यायालयीन आयुक्तांचे अहवाल न्यायालयाकडून रितसर आदेश होऊन रद्दबातल झालेखेरीज नव्याने न्यायालयीन आयुक्त नेमण्याची वादीची मागणी कायद्याने मान्य करता येणेजोगी नाही. दावा मिळकतीबाबतची वस्तुस्थिती शाबीत करण्याची जबाबदारी ही पुर्णतः वादीची आहे. दाव्याचे कामी केवळ पुरावा गोळा करण्याच्या कुटील इराद्याने प्रस्तुतच्या (नि.क्र.२६) अर्जाव्दारे वादीने न्यायालयाकडे कोर्ट कमिशनची पुन्हा एकदा मागणी केली आहे. सबब, अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी तर्फे विधीज्ञ श्रीमती एस.व्ही. हरमलकर यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांना संधी देऊनही त्यांनी प्रस्तुत कामी युक्तीवाद केला नाही. तसेच, युक्तीवाद करण्यास कोणताही मुदतीचा अर्ज आजरोजी दिला नाही. सबब, प्रतिवादीचा युक्तीवाद नाही.

०५. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दाव्याचे कामी निशाण क्र. १८ वरील दिनांक १३/०७/२०१७ रोजीच्या आदेशान्वये उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कुडाळ यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली होती. तसेच, त्यांना वादीच्या विनंतीप्रमाणे स.नं. ७३ हि.नं. १५ तसेच लगतच्या मिळकतीची मोजणी करुन हद्द ठरविण्याबाबत तसेच, त्याठिकाणी एखादे बांधकाम अस्तित्वात आहे किंवा कसे व त्याचे निश्चीत स्थान कोठे आहे हे दर्शविणारा अहवाल देणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते. उपअधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांनी सदर आदेशास अनुसरुन दिनांक १६/११/२०१७ रोजी आपला अहवाल कागदपत्र व नकाशासह न्यायालयात

सादर केला. प्रस्तुत अहवालाच्या अनुषंगाने वादीने आपले म्हणणे देऊन त्यांना कोर्ट कमीशनर अहवाल मान्य नसल्याचे लेखी कथन केले. याऊलट, प्रतिवादीने सदर अहवालाबाबत निशाण २५ येथे आपले म्हणणे सादर करुन सदरचा अहवाल त्यांना मान्य आहे तसेच, तो बहुतांशी खरा व बरोबर आहे असे लेखी म्हणणे दिले आहे.

०६. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया २६ नियम ९ अन्वये केला आहे. परंतु, तो दिवाणी प्रक्रिया संहितेच्या उपरोक्त तरतुदीला धरुन नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. वादी यांनी उपअधिक्षक, भुमी अभिलेख कुडाळ यांचे अहवालातील नेमका कोणता मजकुर कोणत्या कारणासाठी त्यांना मान्य व कबुल नाही याबाबत स्पष्टोक्ती केलेली दिसून येत नाही. सदरील अहवालाचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता, मोजणीच्या वेळी वादी व प्रतिवादी तसेच शिधु ताघु वरक हे पंच उपस्थित असल्याचे दिसून येते. तसेच, सदर नकाशामधील समजुतीच्या टिपा मध्ये भुमी अभिलेखाची सर्व्हे नंबरची हद्द तसेच हिस्सा नंबरची हद्द त्याचप्रमाणे दगडी गडगा व संडासची जागा इत्यादी बाबी टिपासह दर्शविलेल्या दिसून येतात. त्यामुळे वादी यांनी निशाण क्र. १८ येथील अर्जामध्ये मागणी केलेप्रमाणे तसेच, त्यावरील आदेशान्वये सदरचा अहवाल असल्याचे दिसून येते.

०७. वादी यांनी प्रस्तुत अर्जाचे अनुषंगाने सर्व्हे नं. ७३ हि.नं. १६ ची मिळकत हद्दी सहीत मोजणी करुन प्रतिवादीने केलेले संडास व गडग्याचे बांधकाम दाखविण्याचा आदेश जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख ओरोस यांना करावा अशी विनंती केली आहे. सर्व्हे नं. ७३ हि.नं. १६ या मिळकतीची हद्द मोजणी अहवालाप्रमाणे झालेली दिसून येते. तसेच, कोणत्याही मिळकतीची वस्तुस्थितीबाबत पुरावा गोळा करण्याकरीता कोणत्याही पक्षकारास न्यायालयाच्या यंत्रणेची मदत घेता येणार नाही अशी निरीक्षणे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या Sanjay Nadeo Khandare Vs. Sahebrao Kachru Khandare & Ors. , 2001(1)/All MR 653 या केसमधील नोंदविलेली आहेत. प्रस्तुत अर्जाच्या

अनुषंगाने वादीने केलेली मागणी ही दावा मिळकतीची वस्तुस्थिती दर्शविणारा पुरावा गोळा करण्याकरीता असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करता येणार नाही. सबब, उपरोक्त विवेचनाप्रमाणे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.01.07 18:49:27 +0530

कुडाळ. (पी. आर. ढोरे)

दिनांक : ०७/०१/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.